REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# भारतीय शेती व जागतिकीकरण

प्रा. डॉ. नरेंद्र श्रीधर बागडे
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग ,
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड, नागपूर.

## प्रस्तावना



भारत हा कृषी प्रधान देश आहे म्हणून आजही भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचे महत्वाचे स्थान आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ६० टक्के लोकसंख्या ही शेती व शेतीशी निगडीत व्यवसायामध्ये गुंतलेली आहेत. प्राचीन काळापासून शेतीचे महत्व टिकून आहे. पूर्वी सर्वात जास्त रोजगार पुरविणारे क्षेत्र हे शेती क्षेत्र होते. म्हणजेच रोजगाराबरोबर राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सर्वात जास्त वाटा हा शेती क्षेत्राचा होता. परंतु कालांतराने राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होवून सेवा क्षेत्राचा वाटा वाढत गेला. परंतु आजसुद्धा आपण विचार केला तर शेती क्षेत्र हे सर्वात जास्त रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे. भारतीय शेतीच्या विकासाचे अनेक टप्पे आहेत. १९६७.६८ नंतर शेतीमध्ये आधुनिक यंत्र सामुग्रीचा उपयोग सुरु झाल्याने, या क्षेत्रामध्ये उत्पन्न वाढत गेले. तसेच हरित क्रांतीच्या उदयाने भारताचे अन्नधान्य उत्पादन व उत्पादकता वाढली. त्याचबरोबर शेतीला पूरक असणारे व्यवसायदेखील वाढत गेले.

भारतीय शेतीमध्ये ही उलाढाल सुरु असतानांच १९९१ मध्ये जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. या प्रक्रियेला प्रारंभीच्या काळामध्ये विरोध झाला परंतु कालपरत्वे या विरोधाची तीव्रता कमी होत गेली. जगातील शंभर पेक्षा जास्त देशांनी जागतिकीकरणाला मान्यता दिली असून भारताने देखील या प्रक्रियेला मान्यता दिली आहे व त्याच्या अंमलबजावणीस सुरुवात देखील केली आहे.

## संशोधनाचे उद्दिष्ट्ये

१) जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
२) आयात निर्यातीसंदर्भात जागतिकीकरणाच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
३) जागतिकीकरणामुळे भारतीय शेतकऱ्यावरील परिणामांचा अभ्यास करणे.

## भारतीय शेतीवर जागतिकीकरणाचा प्रभाव

देशाचा जलद आर्थिक विकास करायचा असेल तर जागतिकीकरण होणे गरजेचे आहे. या दृष्टीने जागतिकीकरणाकडे पाहले जाते. जगातील देशांना भारतात विविध नैसर्गिक साधनसामुग्री योग्य दरात मिळाल्यामुळे भारतामधून शेती उत्पादनाची निर्यात वाढण्यास मदत होईल. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये भारतीय बाजारापेक्षा शेतमालाच्या किंमती जास्त असल्यामुळे अधिक किंमत मिळून भारताला विदेशी चलन प्राप्त होते. तसेच जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार विकसीत देशांसाठी जे अनुदान दिल्या जात होते ते कमी झाल्यामुळे भारतीय शेतकरी स्पर्धेत टिकून राहू शकणार.

### आयातीवरील निर्बंध दूर

जागतिकीकरणापूर्वी निर्यातीवर जे बंधने होती ती जागतिकीकरणनंतर उठविण्यात आली आहेत. सन १९९५.९६ मध्ये ६१६१ वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध उठविण्यात आले आहेत व नंतर १९९६.९७ साली ४८८, १९९७.९८ साली ३८१, १९९८.९९ साली ८९४ याप्रमाणे आणखी १७६३ वस्तूंच्या आयात संपूर्णपणे संख्यात्मक निर्बध एक वर्षाआधी उठविले व ठरल्याप्रमाणे उरलेल्या ७१५ वस्तूंवरील निर्बंध १ एप्रिल २००१ रोजी उठविण्यात आले.

### बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेती क्षेत्रांमध्ये प्रवेश

जागतिकीकरणानंतर अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बातारपेठेमध्ये प्रवेश केला. या कंपन्या शेतीसाठी लागणाऱ्या बी.बियाणांच्या बाजारात उतरल्या आहेत. त्याचबरोबर अमेरिकेतील कारगिल कॉन्टिनेन्टल ग्रेन आणि युरोपमधील तीन बड्या कंपन्या अशा एकूण पाच कंपन्यांच्या हाती जगातल्या ८० टक्के धान्य बाजार आहे. या कंपन्यांची अर्थक्षमता एवढी प्रचंड आहे की, कोणत्याही देशातील लोकप्रतिनिधी आणि शासनकर्त्यांना त्या खरेदी करु शकतील.

### दुग्धजन्य पदार्थ व जागतिकीकरण

जागतिक व्यापारामध्ये भारताला दुग्धजन्य पदार्थाच्या निर्यातीमध्ये मोठा वाव आहे. कारण भारतामध्ये स्वस्त मजूर व परंपरागत व्यवस्थापनामुळे दुधाची किंमत जागतिक बाजारपेठेमध्ये कमी ठेवता येते. शेतकऱ्यांकडे उपलब्ध असणाऱ्या संसाधनांचा वापर करुन जनावरांचे संगोपन केल्यास दुध उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ करु शकतो आणि या दुधावर प्रक्रिया करुन त्याची निर्यात वाढविता येते. तसेच दुध उत्पादनात अगोदरच अग्रसर असलेल्या आपल्या देशात मनुष्यबळाचा योग्य वापर करुन खुल्या जागतिक बाजारपेठेत आपला हिस्सा वाढवून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळविता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे दुधाची कमतरता असलेल्या देशांमध्ये दुध व दुग्धजन्य पदार्थाच्या निर्यातीस मोठा वाव निर्माण झालेला आहे.

### शेतकी अनुदानावरील कपात

डंकेल प्रस्तावाप्रमाणे मुक्त आयातीबरोबरच शेती उत्पादनावरील अनुदानात कपात केली पाहिजे. या बंधनामुळे भारतीय शेती संकटात सापडली आहे. एकंदरीत शेतीच्या विकासासाठी सरकारकडून अनुदान मिळणे अपेक्षित होते परंतु डंकेल प्रस्तावानुसार विकसीत देशांना २० टक्के तर विकसनशील देशांनी १३. ३३ टक्के अनुदान कपात करणे बंधनकारक आहे. यालाच अनुसरुन भारत सरकारने देखील अनुदानात कपात करण्यास सुरुवात केली आहे.

'दि इकॉलॉजिस्ट' चे संस्थापक संपादक आणि पर्यावरण चळवळीतील विभूती 'एडवर्ड गोल्डस्मिथ' यांच्या मते, 'भारतातील दोन ते तीन एकरापेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी जागतिकीकरणात कसे काय टिकू शकतील? वरील सर्व ठळक बाबींचा विचार केला असता जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीनंतरच्या काळात भारतीय शेतीच्या समस्या कमी होण्याऐवजी अधिक तीव्र होत आहेत. जो शेतीमाल या देशात मुबलक प्रमाणात विकतो तो शेतीमाल या देशात खुलेआम बाहेरुन येत राहील्याने या देशातील शेतीवरअवलंबून असणारे छोटे शेतकरी, कामगार व त्यांची कुटुंबे यांच्या भवितव्याचा प्रश्न बिकट झाला आहे.

### निष्कर्ष

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये जरी माणसाला जगण्याचे पर्याय व संधी निर्माण केल्या असल्या तरी, जागतिक पातळीवर शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. भारतीय शेतकरी हा जागतिक बाजारपेठेतील अमानुष स्पर्धेला बळी ठरलेला दिसतो. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांवर आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेचा दबाव वाढत आहे. स्थानिक कृषी बाजारपेठेवर सावकार मोठा जमिनदार, दलाल यांचे

वर्चस्व आहे. त्यामुळे एकाच वेळी भारतीय लहान शेतकरी जागतिक आणि स्थानिक विषमतेला तोंड देत आहे.

लोकसंख्येची वाढ म्हणजे अन्नधान्यास अधिक मागणी मात्र अन्नधान्य उत्पादन वाढीत घट होत असल्याने, वाढीव लोकसंख्या अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात अनेक अडचणी येणार आहेत. लोकसंख्या वाढ व अन्नधान्य वाढ या दोन्हीतील समतोल बिघडत चालल्याने, भारताची अन्नधान्य सुरक्षितता संपुष्टात येवून, भारतीय अर्थव्यवस्थेला आयातीवर विसंबून रहावे लागेल. जागतिकीकरणाचा हा धोका लक्षात घेवून, अन्नधान्य उत्पादन व देशांतर्गत उत्पादकता वाढविण्यासाठी भारत सरकारने काळानुसार धोरण आखावे. त्याचबरोबर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी मुलभूत संरचनेची निर्मिती करावी. दुसऱ्या बाजूला लोकसंख्येच्या वाढीचा दर देखील नियंत्रीत असणे आवश्यक आहे. जागतिकीकरणामुळे भविष्यात निर्माण होणारे गंभीर प्रश्न टाळल्यास भारतीय अर्थव्यवस्था सक्षम राहील.

## संदर्भ .

१. कराडे जगन, ' जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८.
२. खातू गजानन, 'जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय', अक्षर प्रकाशन, कोल्हापूर, २००१.
३. भोसले व काटे, 'जागतिक अर्थव्यवस्था', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०००.
४. सुब्रम्हण्यम चित्रा, 'भारत विकणे आहे', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.
५. खेर, सी. प., 'जागतिकीकरण : समस्या', आशय आणि अनुभव दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००२.
६. पन्नालाल सुराणा, 'भारत राष्ट्राची जडणघडण' सुगावा प्रकाशन, पुणे, २००२.
७. कुलकर्णी बी.डी., ढमढरे एस.व्ही. 'अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती', डायमंड पब्लिकेशन्स, नागपूर, २००७.
८. बोधनकर सुधीर, अलोणी विवके, कुळकर्णी मृणाल 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१४.